सत्यमेव जयते

# शुल्क नियामक प्राधिकरण

महाराष्ट्र विनाअनुदानित खाजगी व्यावसायिक शैक्षणिक संस्था
(प्रवेश व शुल्क यांचे विनियमन)
"शिक्षण-नव्हेव्यवसाय-ज्ञान यज्ञ"

शासकीय तंत्र निकेतन इमारत,
रुम नं. ३०५, ३ रा मजला, खेरवाडी,
बांद्रा, मुंबई-४०००५१

E-mail:secfra.mu-mh@gov.in/fra.govmh@gmail.com
Website: www.sssamiti.org
दुरध्वनी : ०२२ - २६४७०४६३

क्रमांक :शुनिप्रा/1012/२०१८ दिनांक : १०/९/२०१८

## सूचना

महाराष्ट्र विनाअनुदानित खाजगी व्यावसायिक शैक्षणिक संस्था (प्रवेश व शुल्क यांचे विनियमन) अधिनियम, २०१५ चे कलम १४ नुसार शैक्षणिक वर्ष २०१९-२० या वर्षीचे शुल्क निश्चितीचे प्रस्ताव दि. ३१ ऑक्टोबर, २०१८ पर्यंत सादर करणे **बंधनकारक** आहे.

शुल्क निर्धारणासाठी प्रस्ताव सादर करण्याकरीता शुल्क नियामक प्राधिकरणाने पोर्टल सुरु केले आहे. तसेच शैक्षणिक वर्ष २०१९-२० साठी प्रक्रीया शुल्क (Processing fee) माफ करण्यात आलेले आहे.

ज्या संस्थांनी शैक्षणिक वर्ष २०१९-२० साठी प्राधिकरणाने निश्चित केलेले शैक्षणिक वर्ष २०१८-१९ चे शुल्क कायम ठेवायचे आहे त्यांनी पोर्टल मध्ये No Upward Revision चा पर्याय निवड करावा.

शुल्क नियामक प्राधिकरणाकडून शैक्षणिक वर्ष २०१८-१९ या वर्षीचे शुल्क मंजूर करुन घेतलेल्या संस्थांनी शैक्षणिक वर्ष २०१९-२० करीता शुल्क निर्धारणाचा प्रस्ताव विहीत कालावधीत सादर न केल्यास अशा संस्थांनी "अपरिवर्तनीय पुनरावृत्ती नाही" (No Upward Revision) करीता प्रस्ताव दिल्याचे समजण्यात येईल.

ज्या संस्थांनी शैक्षणिक वर्ष २०१८-१९ चे शुल्क प्राधिकरणाकडून मंजूर करुन घेतलेले नाही अशा संस्थांना शैक्षणिक वर्ष २०१९-२० करीता No Upward Revision चा पर्याय निवडता येणार नाही. शैक्षणिक वर्ष २०१८-१९ चे शुल्क प्राधिकरणाकडून निर्धारीत झालेले नसल्यास सदर संस्था अधिनियमातील तरतूदीनुसार दंडास पात्र राहतील.

कृषी महाविद्यालयाचे प्रस्ताव दाखल करणाऱ्या संस्थाना उपरोक्त सूचना लागू असणार नाहीत. त्यांनी शैक्षणिक वर्ष २०१९-२० करीता शुल्क निर्धारणाचे प्रस्ताव सादर करणे अधिनियमातील तरतूदीनुसार बंधनकारक आहेत.

डॉ. माणिक गुरसळ (भाप्रसे)
सचिव
**शुल्क नियामक प्राधिकरण**

प्रत: १. मा. अतिरिक्त मुख्य सचिव, कृषी विभाग, मंत्रालय, मुंबई.
२. मा. प्रधान सचिव, आदिवासी विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.
३. मा. प्रधान सचिव , माहिती आणि तंत्रज्ञान, विभाग, मंत्रालय, मुंबई.
४. मा. सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई.
५. मा. सचिव, वैद्यकीय शिक्षण आणि संशोधन संचालनालय, मंत्रालय, मुंबई.
६. मा. सचिव, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, मंत्रालय, मुंबई.
७. मा. सचिव, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागास प्रवर्ग कल्याण संचालनालय विभाग मंत्रालय, मुंबई.
८. मा. सचिव, प्रवेश नियामक प्राधिकरण, मुंबई.
९. मा. आयुक्त, आदिवासी विभाग, नाशिक.
१०. मा. आयुक्त, सामाजिक न्याय, पुणे.
११. मा. संचालक, वैद्यकीय शिक्षण आणि संशोधन संचालनालय, मुंबई.
१२. मा. संचालक, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागास प्रवर्ग कल्याण संचालनालय , पुणे.
१३. मा. संचालक, उच्च शिक्षण विभाग, पुणे.
१४. मा. संचालक, तंत्र शिक्षण विभाग, मुंबई.
१५. मा. संचालक, महाराष्ट्र कृषी शिक्षण व संशोधन परिषद, पुणे.
१६. मा. संचालक, आयुष संचालनालय, मुंबई.
१७. मा. रजिस्ट्रार , महाराष्ट्र परिचर्या परिषद, मुंबई.
१८. सर्व खाजगी व्यावसायिक विनाअनुदानित शैक्षणिक संस्था.